# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०३/२०२४ (बुधवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ३७,३२,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक १२/०३/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, शिवराज माथुरकर, रा. शारदा चौक मौदा हा त्याचे मालकीची १० चक्का टाटा कंपनीची टिप्पर वाहन क्र. एम. एच—४०/बि. जी—८०८५ चा वापर करून पटदान शिवार (चिकना) परीसरात वि. एम. विटाभट्टीचे मागचे परीसरातील नदीचे पात्रातून रेती चोरी करून शासनाचा महसुल बुडवुन जेसीबीचे साहाय्याने टिप्पर मध्ये लोड करून अवैधरीत्या वाहतूक करून विक्री करतो. अशा खात्रीशीर बातमीवरून मौदा येथील वि. एम. विटाभट्टीचे मागचे परीसरात पटदान (चिकना) शिवारात नाकाबंदी करीत असताना टाटा कंपनीची १० चक्का टिप्पर क्र. एम.एच—४०/बि.जी—८०८५ चा चालक **आरोपी नामे— विशाल दिवाकर श्रीरामे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. १६, ढिवर मोहल्ला मौदा २) स्वप्नील अशोकजी गोंडाणे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. ८ ढिवर मोहल्ला मौदा** यांना स्टाफने थांबवून पाहणी केली असता टिप्पर वाहनामध्ये अंदाजे ०४ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) टाटा कंपनीची १० चक्का टिप्पर क्र. एम.एच—४०/बि. जी—८०८५ किंमती ३७,००,०००/—रू. मध्ये ०४ ब्रास रेती किमती प्रत्येकी ५०००/—रू. प्रमाणे २०,०००/—रू. जुना वापरता ॲडरॉइड कंपनीचा मोबाईल किंमती १२,०००/—रू. असा एकुण ३७,३२,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) विशाल दिवाकर श्रीरामे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. १६, ढिवर मोहल्ला मौदा २) स्वप्नील अशोकजी गोंडाणे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. ८ ढिवर मोहल्ला मौदा ३) शिवराज माथुरकर, रा. वय ३६ वर्ष, रा. शारदा चौक मौदा (गाडी मालक) ४) अज्ञात जेसीबी मशिन वाहन ऑपरेटर आणि मालक पाहीजे आरोपी** हे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. असे एकुण ०४ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे मौदा येथे अप क्र. २८९/२०२४ कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद**
**वाहनासह एकुण ४५,७१,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**
**नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई**

दिनांक १२/०३/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोलीस ठाणे—उमरेड हद्दीत गस्त करीत असता, गोपनीय सुत्रधाराकडुन माहीती मिळाली की, १४ चक्का एलपी वाहनामध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती लोड करून भिवापुर कडुन नागपुर मार्गे जाणार आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरून मौजा उमरेड हद्दीतील मेन रोडवरील डब्ल्युसिएल परीसरात इंडीयन पेट्रोलपंपजवळ रोडवर थांबुन अवैध रेती सबंधाने अचानक नाकाबंदी करून नागपुरकडे जाणारे वाहने चेक करीत असता, दिनांक १२/०३/२०२४ रोजी १९.१० वा. सुमारास एक १४ चक्का एलपी गाडी आढळून आली. सदरचे वाहनावर संशय आल्याने, सदर वाहन चालकांना थांबण्याचा इशारा देवुन सदर वाहनांची पाहणी केली असता, एक काळया व पिवळया रंगाची टाटा कंपनीची १४ चक्का एलपी वाहन क्र. एम.एच. ३४/बि. झेड. ३६३५ हे वाहन आढळून आले. सदर वाहन चालक व कंडक्टर यांना नाव व पत्ता विचारले असता **१) शेख सुल्तान शेख मोहम्मद, वय ३२ वर्ष, रा. कामुंजा प्लायवुड कंपनी जवळ, तह. जिल्हा—अमरावती, (१४ चक्का एलपी वाहन क्र. एम.एच. ३४/बि. झेड. ३६३५ चा चालक) २) अब्दुल समीर अब्दुल अयुब, वय २३ वर्ष,** असे सांगितले. सदर वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे १३ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) टाटा कंपनीची १४ चक्का एलपी वाहन क्र. एम.एच. ३४/बि. झेड. ३६३५ किंमती ४५,००,०००/—रू. मध्ये १३ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/—रू. प्रमाणे ६५,०००/—रू. , जुना वापरता ॲडरॉइड विवो कंपनीचा मोबाईल किंमती ६०००/—रू. असा एकुण ४५,७१,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे—**१) शेख सुल्तान शेख मोहम्मद, वय ३२ वर्ष, रा. कामुंजा प्लायवुड कंपनी जवळ, तह. जिल्हा—अमरावती, (१४ चक्का एलपी वाहन क्र. एम.एच. ३४/बि. झेड. ३६३५ चा चालक) २) अब्दुल समीर अब्दुल अयुब, वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, गफुर बस्ती भातकुली जि. अमरावती ३) मालक नामे— मुदस्सर हुसेन अल्ताफ हुसेन, वय ४५ वर्ष, आसोरिया पेट्रोल पंपजवळ अमरावती** असे एकुण ०३ आरोपी यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर